**प्रेस नोट दिनांक ०८/०५/२०१९**
**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**
**लहान बाळास त्याचे वडिलांचा शोध घेवुन ताब्यात सुखरुप दिले बाबत.**

दिनांक ०५/०५/२०१९ रोजी चंदननगर पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये कोलंबिया हॉस्पीटलसमोर, खराडी बायपास रोडवर मुलगा नामे उमेश, वय ४ वर्षे हा रडत असतांना मिळुन आला होता. हॉस्पीटलचे कर्मचारी यांनी पोलीस ठाणेस फोन करुन कळविले असता सदर मुलास खराडी मार्शलचे कर्मचारी पोना. ४८१५, पांडुरंग माने व पोशि. ९१२०, राहुल बडेकर यांनी कोलंबिया हॉस्पीटल येथुन ताब्यात घेवुन खराडी पोलीस चौकीस नेवुन ठेवले. तेथे सदर मुलाचा मोबाईलमध्ये फोटो काढुन, त्यास त्याचे नाव, पत्ता विचारता ते घाबरलेल्या मनस्थितीत असल्याने त्यास काही एक सांगता येत नव्हते. त्यामुळे त्याचे नातेवाईकांचा शोध घेणे अवघड व कठीण झाले होते. सदर मुलाचा मार्शलचे कर्मचारी यांनी खराडी चौकीचे व आजुबाजुचे परीसरामध्ये रहिवाशांना फोटो दाखवित गवळीवाडा, साईनाथनगर, खराडी, पुणे येथे आले असता त्याचे वडिल श्री. सुभाष राठोड यांनी सदर फोटो पाहुन तो त्यांचा मुलगा असल्याचे सांगितले व मुलगा हरवल्याने त्यास पाहणेसाठी आतुर झाले होते. मुलाचे वडिलांना चौकीस आणुन त्यांचा मुलगा ताब्यात दिला असता, त्यांचा आनंद व्दिगुणीत होवुन, खुश झाले. त्यांचा मुलगा त्यांना सुखरुपपणे परत मिळवुन दिलेबाबत मुलाचे वडिलांनी पोलीस कर्मचारी यांचे कौतुक करुन, आभार मानले आहेत. सदरची चांगली कामगिरी पोना. पांडुरंग माने व पोशि. राहुल बडेकर यांनी केली आहे. मुलगा ताब्यात दिलेचा फोटो खाली सादर केला आहे.

